• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४४ • शनिवार, दि. १६ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 344 • Saturday 16 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955



## इंडिया आघाडीचा भ्रमनिरास होईल -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

आम्ही ऑप्टिकल फायबर आणि ५-जी देशाला दिले, डिजिटल इंडिया योजना आमच्या नावावर आहे. इंडिया आघाडीच्या नावावर लाखो कोटींचा २-जी घोटाळा झाला आहे आणि द्रमुक त्या लुटीचा सर्वात मोठा वाटेकरी होता. उडानमध्ये आमचे नाव. इंडी गठबंधनच्या नावाने एक हेलिकॉप्टर घोटाळा आहे. आमच्या खेलो इंडिया आणि टॉप्स योजनांमुळे देशाला क्रीडा क्षेत्रात मोठी उंची गाठण्यात मदत झाली आहे, परंतु राष्ट्रकुल क्रीडा घोटाळ्याने त्यांचे नाव कलंकित झाले आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर टीका केली. लोकसभा निवडणुकीपूर्वी प्रचारासाठी कन्याकुमारी, तामिळनाडू येथे मोदी पोहोचले. येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना मोदींनी आघाडीवर जोरदार निशाणा साधला. त्यांनी विरोधी आघाडीच्या घोटाळ्यांची माहिती दिली आणि त्यांची यादी खूप मोठी असल्याचे सांगितले. मोदी म्हणाले, देशाच्या या दक्षिणेकडील भागात आज कन्याकुमारीपासून जी लाट उठली आहे, ती लाट खूप पुढे जाणार आहे. मी १९९१ मध्ये कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत एकता यात्रा घेऊन गेलो होतो, यावेळी मी एकता यात्रेत सहभागी झालो होतो. देश तोडण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांना काश्मीरच्या जनतेने नाकारले आहे. आता तामिळनाडूची जनताही तेच करणार आहे. तमिळच्या भूमीवर मोठ्या बदलाचा आवाज मला दिसत आहे. यावेळी तामिळनाडूमध्ये भाजपमुळे द्रमुक आणि काँग्रेसच्या इंडिया आघाडीचा भ्रमनिरास होईल. इंडिया आघाडी कधीही तामिळनाडूचा विकास करू शकत नाही. या लोकांचा (इंडिया आघाडीचा) इतिहास घोटाळ्यांचा आहे. जनतेला लुटण्यासाठी सत्तेत येणे हाच त्यांच्या राजकारणाचा आधार आहे. एकीकडे भाजपच्या कल्याणकारी योजना आहेत, तर दुसरीकडे त्यांचे करोडोंचे घोटाळे आहेत, असा आरोप मोदींनी केला. मोदी यांनी द्रमुकवरही निशाणा साधला. त्यांनी डीएमकेला तामिळनाडूचा शत्रू म्हटले आहे. ते म्हणाले, द्रमुक हा केवळ तामिळनाडूच्या भविष्याचा शत्रू नाही, तर द्रमुक हा तामिळनाडूच्या भूतकाळाचा आणि वारशाचाही शत्रू आहे. जल्लीकट्टूवर बंदी असतानाही द्रमुक आणि काँग्रेस गप्प राहिले. या लोकांना तमिळ संस्कृती नष्ट करायची आहे. हे आमचे सरकार आहे, एनडीए सरकारने जल्लीकट्टू उत्साहात साजरा करण्याचा निर्णय घेतला.

### ठाकरेंची मशाल धगधगणार



मुंबई - ठाकरेंच्या शिवसेनेला मोठं यश मिळण्याची शक्यता आहे. ओपिनियन पोलनुसार, ठाकरेंची शिवसेना पक्ष मिळून १६ जागा मिळणार असल्याचा अंदाज समोर आलाय. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या जागा विचार केला तर दोन्ही पक्षांना मिळून केवळ ६ जागा मिळणार असल्याचा अंदाज ओपिनियन पोलमधून व्यक्त करण्यात आलाय. ओपिनियन पोलनुसार, महाविकास आघाडीला २० तर महायुतीला २८ जागा मिळणार असा अंदाज व्यक्त केला जातोय. सध्या अनेक विद्यमान खासदार ठाकरे गटाचे प्रमुख ठाकरेंची साथ सोडून मुख्यमंत्री यांच्यासोबत आले आहेत. त्यामुळे १८ खासदारांपैकी १२ पेक्षा जास्त खासदार आहेत. मात्र, आगामी लोकसभा निवडणूकीत दोघांचे पक्ष मिळून केवळ ६ जागा निवडून आणतील, असा अंदाज ओपिनियन पोलमधून व्यक्त केला जातोय. त्यामुळे यांच्याकडे खासदारांची मोठी संख्या असताना देखील निवडणुकीत मात्र, पदरी अपयशच पडताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील २३ जागांवर विजय मिळवला होता. आगामी लोकसभा निवडणूकीत मात्र, भाजपची एक जागा घटण्याची शक्यता आहे. कारण पोलनुसार भाजपला २२ जागा मिळतील असा अंदाज आहे. तर काँग्रेस पक्षाला २०१९ च्या निवडणूकीत बाळू धानोरकर यांच्या रुपाने केवळ एक जागा जिंकता आली होती. आगामी निवडणूकीत मात्र, काँग्रेस ४ जागांवर विजय मिळेल, असा अंदाज ओपिनियन पोलने वर्तवला आहे.

## बीड लोकसभेसाठी 'बजरंग' मैदानात?

**बीड । प्रतिनिधी**



आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने बीडमधून विद्यमान खासदार प्रीतम मुंडे यांचे तिकीट कापून पंकजा मुंडे यांना लोकसभेच्या रिंगणात उतरवलं आहे. पंकजा मुंडे यांना लोकसभेची तिकीट जाहीर होताच बजरंग सोनवणे वेगळा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांची तातडीची बैठक बोलावली आहे. त्यात ते आगामी लोकसभा निवडणुकीबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. मागील लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोकसभेची उमेदवारी लढवली होती. तेव्हा प्रीतम मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यात चुरशीची लढत झाली. आता भाजपाने प्रीतम मुंडेऐवजी पंकजा मुंडे यांना लोकसभेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे नाराज झालेल्या बजरंग सोनवणे यांनी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात घडामोडींना वेग आला आहे. येडेश्वरी साखर कारखानाच्या माध्यमातून सोनवणे यांनी शेतकरी आणि कार्यकर्त्यांची मजबूत फळी तयार केली आहे. गेल्या लोकसभेत त्यांना मोठ्या प्रमाणत मतदानही पडले होते. बीड लोकसभेसाठी बजरंग सोनवणे यांच्या बंगल्यावर मित्रमंडळाची आणि कार्यकर्त्यांची बैठक होत आहे. सोनवणे यांच्या कार्यकर्त्यांची काय भूमिका असेल? सोनवणे पक्ष सोडणार का? पुन्हा यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सोनवणे-मुंडे अशी लढत पाहायला मिळणार का हे पुढील २-३ दिवसांत स्पष्ट होईल.



**बीड - माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांची बीड लोकसभा मतदार संघाची उमेदवारी जाहिर झाल्याबद्दल प्रचार सभांचा धडाका सुरु केला असून गावागावात वाढता प्रतिसाद मिळत आहे.**



**बीड - भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पक्ष कार्यालयात महाविजय २०२४ साठी सुपर वॉरियर्स म्हणून नेमणुका करण्यात आल्या. बीड लोकसभा मतदारसंघ आणि बीड विधानसभा मतदार संघातील महाविजय संघटनात्मक कामे पूर्ण करून भाजप अपेक्षित यश मिळवेल अशी अपेक्षा जिल्हाध्यक्ष मस्के यांनी व्यक्त केली. भारतीय जनता पार्टी प्रदेशच्या वतीने सुपर वॉरियर्स नियुक्तीबद्दल अभिनंदन आणि आगामी निवडणुकीसाठी शुभेच्छा देताना बीड भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यावेळी दिसत आहेत.**



## मतदार संघात सर्वांगिण विकास करणार -आ.नमिता मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील वर्ग-१, वर्ग-२ अधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी राज्य सरकारने १०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सध्याच्या जीर्ण झालेल्या निवासस्थानांची दुरवस्था जाणून घेतल्यानंतर केज विधनासभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी नवीन निवासस्थाने आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना नवीन वसतिगृह इमारत मिळावी यासाठी शासनाकडे युद्धपातळीवर केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय येथील अधिकाऱ्यांच्या निवासाची सोय म्हणून रुग्णालय परिसरात अंदाजे ५० वर्षापूर्वी निवासस्थाने उभारण्यात आले. कालौघात या इमारती जीर्ण झाल्याने कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची इमारत देखील जुनी झाली असून ती अपुरी देखील पडत होती. या इमारतींच्या दुरावस्थेबाबत बाबत सखोल माहिती घेतल्यानंतर आ. नमिता मुंदडा यांनी नवीन इमारतींसाठी शासन पातळीवर पप्रयत्न सुरु केला. आ. मुंदडा यांनी याबाबत त्यांच्याकडे आग्रही मागणी केली. अखेर आ. मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश आले असून शासनाने स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील वर्ग-१, वर्ग-२ अधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी १०२ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून वर्ग-१ अधिकाऱ्यांची ४० आणि वर्ग-२ अधिकाऱ्यांची ६० निवासस्थाने बांधण्यात येणार आहे. तर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी १५० क्षमतेचे वसतिगृह असणार आहे. यानिमित्ताने अधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतम मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत. मागील वर्षी शासनाने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील वर्ग -३, वर्ग-४ कर्मचाऱ्यांसाठी एकूण ३५२ नवीन निवासस्थाने बांधण्यासाठी दिडशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निवासस्थानांच्या बांधकामाला लोकसभा निवडणुकीनंतर सुरुवात होणार असल्याची माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली. दरम्यान, एकूण २५२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून निवासस्थानासह विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रश्नही मार्गी लावल्याबद्दल येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आ. मुंदडा यांचे आभार मानले आहेत.

संपादकीय

# भाजपची सज्जता

राहुल गांधी यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’मध्ये काँग्रेस मग्न असतानाच भाजपने लोकसभा निवडणुकांसाठी उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करून टाकली. निवडणूक आचारसंहिता लागण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राज्यांचा दौरा सुरूच ठेवला असून, हजारो कोटी रुपयांच्या शेकडो प्रकल्पांच्या उद्घाटनांचा त्यांनी धडाका लावला आहे. गेल्या २९ फेब्रुवारीला झालेल्या पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत लोकसभेसाठी १९५ उमेदवारांची पहिली यादी निश्चित झाली आणि २ मार्च रोजी ती जाहीर करण्यात आली. पहिल्या यादीत मोदी, त्याचप्रमाणे लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला आणि ३४ केंद्रीय राज्यमंत्र्यांची नावे समाविष्ट होती. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विदिशामधून तिकीट देऊन त्यांच्या नावावर काट मारण्यात येणार आहे, अशा गप्पांना विराम देण्यात आला. विशेष म्हणजे, लखीमपूर खेरीमधून वादग्रस्त खासदार अजय मिश्रा टेनी, तसेच उन्नावमधून साक्षी महाराज यांना उमेदवारी जाहीर केली गेली. टेनी यांच्या मुलाने काही शेतकर्यांना जीपखाली चिरडले, असा आरोप होता आणि खुद्द टेनी यांनीही वार्ताहरांना धमकावल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. साक्षी महाराज यांनी धार्मिक द्वेष पसरवणारी वक्तव्ये केल्याचा आरोप होता. खरे तर, या दोघांना घरी पाठवण्यात येईल, असे वाटत होते; परंतु तसे घडले मात्र नाही. आता दहा राज्यांतील ७२ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली असून, त्यात महाराष्ट्रातील २० जणांचा समावेश आहे. त्यातील ठळक नाव आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे. गडकरी यांनी केंद्रीय मंत्री म्हणून पायाभूत क्षेत्र आणि रस्ते विकासात नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. लोकसभा आणि राज्यसभेत विरोधी पक्षही त्यांचे नेहमीच कौतुक करतात. अशावेळी मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे त्यांच्या विरोधात आहेत आणि म्हणून त्यांचा पत्ता साफ केला जाईल, अशा कपोलकल्पित कथा रचण्यात आल्या. एरव्ही अधूनमधून आपली नाराजी प्रकट करणार्या पंकजा मुंडे यांना बीडमधून उमेदवारी देत त्यांची अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न झाला आहे. बहिणीच्या जागी मला उमेदवारी नको आहे आणि महायुतीमुळे धनंजय मुंडे यांना तेथील विधानसभा मतदारसंघ मिळाला आहे. पर्यायाने मला आता मतदारसंघच उरलेला नाही, अशा आशयाचे उद्गार पंकजा यांनी काढले होते. मला लोकसभेची उमेदवारी मिळू नये, अशी मीच प्रार्थना करत आहे, अशी भावना व्यक्त करणारे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूरमधून उमेदवारी देण्यात आली. प्रतिष्ठित अशा पुणे मतदारसंघातून उभे राहण्यासाठी भाजपचे सरचिटणीस सुनील देवधर, माजी शहरप्रमुख जगदीश मुळीक आणि माजी राज्यसभा खासदार संजय काकडे इच्छुक होते. परंतु, पुण्याचे महापौर राहिलेले मुरलीधर मोहोळ उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाले. गेल्या वर्षी कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत हेमंत रासने यांना उमेदवारी दिली गेली; पण त्यांचा पराभव झाला. म्हणून यावेळी मतपेढी सांभाळण्यासाठी देवधर यांना तिकीट दिले जाईल, असे मानले जात होते. २०१९ मध्ये पुण्यातून गिरीश बापट हे निवडून आले होते; परंतु मोहोळ हे कार्यकर्तृत्वामुळे पुण्यात लोकप्रिय आहेत. उत्तर मुंबई मतदारसंघातून गेल्यावेळी देशात दुसर्या क्रमांकाच्या मताधिक्याने गोपाळ शेट्टी निवडून आले होते; परंतु त्यांना डावलले असून, तेथून पीयूष गोयल यांना रिंगणात उतरवले आहे. साहजिकच शेट्टी नाराज झाल्यामुळे त्यांची समजूत काढण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या भेटीस जावे लागले; परंतु शेट्टी हे निष्ठावंत असल्यामुळे ते समर्थकांचीही समजूत काढतील, असे सांगितले जाते. शिवाय राज्यसभेतून खासदार आणि मंत्री झालेल्या नेत्यांनीही रीतसर लोकसभेच्या मैदानात उतरून निवडून यावे, हे भाजपचे धोरण आहे. काँग्रेसमध्ये वर्षानुवर्षे १० जनपथची सेवा करून, म्हणजेच पक्षश्रेष्ठींची मर्जी राखून राज्यसभेवर जायचे, मागच्या दाराने मंत्री व्हायचे आणि शिवाय ‘राष्ट्रीय नेते’ म्हणून मिरवत राहायचे ही परंपरा आहे. गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा, मुकुल वासनिक असे अनेक काँग्रेस नेते याच वाटेने मोठे झाले. परंतु, भाजपमध्ये नवी वाट निवडलेली दिसते. रावेरमधून रक्षा खडसे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आल्यामुळे त्यांचे सासरे एकनाथ खडसे हेदेखील पुन्हा भाजपमध्ये परततील, अशा चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील चार खासदारांना धक्का देण्यात आला, तर तीन माजी मुख्यमंत्र्यांना लोकसभेत उतरवले आहे. भाकरी फिरवून योग्य माणसांना योग्य ठिकाणी हलवायचे आणि त्यांच्या जागी नव्या लोकांना संधी द्यायची, ही रणनीती आहे. केंद्रीय मंत्री भारती पवार, हीना गावित यांनाही पुन्हा संधी दिली गेली असून, गेली पाच वर्षे प्रतीक्षेत असलेल्या प्रदेश उपाध्यक्ष स्मिता वाघ यांना जळगावची उमेदवारी मिळाली. महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान महिला या यादीत दिसतात.

# संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण व विविध कार्यक्रम संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**



संगमनेर तालुक्यातील आंबी खालसा येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या वतीने वृक्षारोपण,पक्ष्यांना मातीची भांडे वाटप कार्यक्रम संपन्न झाला.या प्रसंगी राज्याचे अध्यक्ष प्रमोद दादा मोरे,कार्याध्यक्षा छायाताई राजपूत,जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार,कार्याध्यक्ष श्री प्रमोद काकडे,सचिव श्री अनिल लोखंडे,पुणे जिल्हाध्यक्ष श्री मारुती कदम,नगर जिल्हाध्यक्ष श्री तुकाराम अडसूळ,योगिता पवार वनरक्षक,एस एच लोंढे वनपरिक्षेत्र अधिकारी संगमनेर, हारून सय्यद वनपाल घारगाव, अ.नगर लोकमतचे सहाय्यक व्यवस्थापक श्री ओंकार जोशी यांचे शुभहस्ते आंबी खालसा येथील ग्रामस्थांनी नक्षत्रवनया राबवलेल्या नवीन संकल्पनेच्या जागेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी मंडळाचे राज्य संघटक श्री संतोष परदेशी,प्रकाश केदारी,आंबी खालसा गावाचे सरपंच श्री बाळासाहेब ढोले पाटील,मंडळाचे राज्य संघटक श्री बाळासाहेब गाडेकर,चेअरमन श्री सुरेश कान्होरे,सुरेशशेठ गाडेकर,'राज्य प्रसिद्ध प्रमुख' पत्रकार आण्णासाहेब साबळे,तुकाराम पोपेरे,राज्य संपर्क प्रमुख उत्तम पवार सर,डॉ.शरद दुधाट,शालिनी आंबरे,संजय गायकवाड,वर्षा घुले,पद्मा राजपूत,सुधाकर शेटे,संजय कारखिले,सुनिल कार्ले,रामेश्वर चेमटे,मदन राजपूत,आनंदा झरेकर,नम्रता पवार,मंजुषा शेवाळे,वैशाली कडलग,संदिप कानवडे,राजेंद्र आहेर,राम वाकचौरे,दिनकर दातीर,सखाराम मेसे,चंद्रकांत भोजने,सिकंदर पोपेरे,साबळे सर,व पर्यावरण मंडळातील सर्व पदाधिकारी,ग्रामस्थ,बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्रास्ताविक श्री प्रमोद काकडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन समाजावून दिले.तर छायाताई राजपूत यांनी १२ राशींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले असून त्या पर्यावरणाची रक्षा,जीवनाची सुरक्षा याबद्दल माहिती पटवून दिली.तर प्रा.अनिल लोखंडे यांनी यासाठी आंबी खालसा गावचे सरपंच श्री बाळासाहेब ढोले पाटील,उपसरपंच,सामाजिक कार्यकर्ते श्री बाळासाहेब गाडेकर पाटील,आंबी माळेगाव सोसायटी चेअरमन श्री.सुरेश पाटील कान्होरे यांनी कार्यक्रमांचे छान नियोजन केले.गावामध्ये

वृक्षसंवर्धनासाठी प्रत्येक झाडाला ठिबक करण्यात आले आहे.या जनहिताच्या कामाला प्राधान्य देऊन पर्यावरण संवर्धणासोबत अनेक लोकभिमुख योजना राबविल्या जात आहे त्याबद्दल सर्व उपस्थितीतांचे वतीने कौतुक केले.याप्रसंगी मुख्यमंत्री शाळा,स्वच्छ शाळा अभियान अंतर्गत पुणे विभागात प्रवरा कन्या विदया मंदीर व कानिष्ठ महाविद्यालय लोणी शाळा प्रथम क्रमांकाने पात्र ठरून २१ लाखाच्या बक्षीसास पात्र ठरली म्हणून विद्यालयाचे ज्येष्ठ आध्यापक श्री अनिल लोखंडे सर,नगर तालुका स्तरावर प्रथम तुकाराम अडसूळ सरांची शाळा, शिरूर तालुक्यात मारुती कदम सर या सर्वांचा ग्रामस्थांच्या व पर्यावरण मंडळाचे वतीने शाल,फेटा व वृक्ष भेट देऊन सत्कार व बहुमान करण्यात आला.अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करीत चांगल्या कामाचे कौतुक केले.तसेच मान्यवरांच्या हस्ते मंडळाच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील केलेल्या उत्कृष्ट कामानिमीत्त कर्तृत्ववान ११ महिलांचा सन्मान करण्यात आला.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री प्रमोददादा मोरे यांनी सांगितले की पर्यावरणाच्या सान्निध्यात कधीही कोणत्याही गोष्टीचा ताणतणाव नसतो,निसर्गात माणूस निसर्गासारखा राहतो.निसर्ग माणसाशिवाय राहू शकतो,परंतु माणूस निसर्गाशिवाय राहू शकत नाही म्हणून निसर्गाचे रक्षण प्रत्येकाने करावे.आपले जीवन आनंदी राहण्यासाठी पर्यावरण संतुलना अतिशय महत्वाचे आहे तरच प्रदूषणमुक्त वातावरण,पशुपक्षी संवर्धनासाठी प्रयत्न,अन्न व पोषण साखळी अबाधीत ठेवूया असे अनेक मान्यवरांनी मत मांडले.शेवटी आभार माणून स्वादिष्ट भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.भरगच्च कार्यक्रमामुळे निसर्ग व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाचे कार्यकर्ते नवीन ऊर्जा घेऊन एका नवीन प्रेरणेने समाज सेवा करण्यासाठी सज्ज झाले.

# लोकमान्य टिळक महाविद्यालयात प्रकाशन



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात 'दीपस्तंभ 'या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून १९ व्या शतकातील कर्तबगार तरीही विस्मृतीत गेलेल्या महिलांची माहिती करून देणारा ' दीपस्तंभ 'या भित्तीपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के एम पवार यांच्या हस्ते झाले.१९ व्या शतकामध्ये सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या शिवाय पंडिता रमाबाई, पहिल्या भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, प्रत्यक्षात रुग्णसेवा करणाऱ्या पहिल्या महिला डॉक्टर रखमाबाई राऊत यांनी देखील आपल्या कार्याच ठसा उमटवलेला आहे. रखमाबाई यांची घटस्फोटाची केस आजही संपूर्ण जगामध्ये एक संदर्भ म्हणून दिली जाते.परंतु आजच्या पिढीपर्यंत त्यांचे कार्य फारसे पोहचले नाही. हेच लक्षात घेऊन या महिलांचा कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणारे 'दीपस्तंभ' भित्तीपत्रक तयार करण्यात आल्याची माहिती अंतर्गत महिला समितीच्या समन्वयक प्रा.डॉ मनिषा ससाने यांनी या प्रसंगी दिली. या यावेळी कनिष्ठ महाव्यिालयाचे पर्यवेक्षक प्रा गोपीचंद घायतिडक, प्रा. विठ्ठल तंबुड, प्रा.ज्ञानेश्वर शेंडगे,प्रा.राधा राठोड, शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.भित्तीपत्रक निर्मितीसाठी प्रा.डॉ.अशोक खेत्री यांनी विशेष सहकार्य केले.या

# उमेदवार कुणीही असो, मोदींच्या नावावर मत देणार का?

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीची घोषणा लवकरच होणार आहे. दरम्यान, विविध संस्था सर्व्हेच्या माध्यमातून देशातील जनमताच्या कौलाचा अंदाज घेत आहेत. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीत मतदारसंघात उमेदवार कुणीही असला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर भाजपाला मतदान करणार का? असा प्रश्न विचारला असता मतदारांनी धक्कादायक उत्तर दिल्याचे समोर आले आहे. न्यूज १८ नेटवर्कने केलेल्या ओपिनियन पोलमध्ये आगामी लोकसभा निवडणुकीत मतदारसंघात उमेदवार कुणीही असला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर भाजपाला मतदान करणार का? असा प्रश्न विचारला असता तब्बल ८५ टक्के मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे उमेदवार कुणीही असला तरी भाजपाला मत देणार असं सांगितलं आहे. तर ११ टक्के मतदारांनी मोदींकडे पाहून नाही तर उमेदवार पाहून मतदान करणार, असं सांगितलं. तर ४ टक्के मतदारांनी या प्रश्नावर काही सांगू शकत नाही असं सांगितलं. दरम्यान, केंद्रातील मोदी सरकारच्या कामगिरीबाबत या सर्व्हेमधून विचारले असता ८० टक्के मतदारांनी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कामगिरीवर खूप समाधानी असल्याचे सांगितले. तर १० टक्के लोकांना समाधानी वा असमाधानी नसल्याचे सांगितले. मोदी सरकारच्या कामगिरीवर असमाधानी असल्याचे सांगितले. तर ४ टक्के लोकांनी खूपच असमाधानी असल्याचे सांगितले. एक टक्का लोकांनी काही सांगू शकत नाही असे सांगितले.

# आकांक्षा हिची वनरक्षक पदी निवड

**आष्टी प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील आकांक्षा सोमीनाथ खांडवे या युवतीने जिद्द ,कष्ट, चिकाटीच्या जोरावर ठाणे जिल्ह्यात वनरक्षक पदी निवड झाली आहे. तिच्या या निवडीबद्दल दि.१५रोजी कऱ्हेवडगाव येथे नागरी सत्कार करण्यात आला. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. आकांक्षा खांडवे ला शालेय जीवनापासून खेळाची आवड होती. तीने राज्यस्तरीय तसेच विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत अनेक पारितोषिक मिळवले आहेत. पोलिस खात्यात नोकरी करण्याची तीव्र इच्छाशक्ती असल्याने या यशाला तीने गवसणी घातली. गावातील मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी नोकरी मिळवण्याचा दृढ निश्चय करावा असे उपस्थितांना आकांक्षा खांडवे हिने सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कल्याण नागरगोजे होते.तर जालिंदर गायकवाड, केशव बांगर, रामभाऊ नागरगोजे आदिंनी मनोगत व्यक्त केले.



या कार्यक्रमाला मा. सरपंच केशव बांगर, मा. व्हाईस चेअरमन भगवान सांगळे, सहशिक्षिका रंजना सांगळे, सरोदे सर,मा. सरपंच जालिंदर गायकवाड, आत्माराम नागरगोजे,ग्रा.पं. सदस्य जालिंदर खांडवे ,ग्रा.पं.सदस्य शुभम खांडवे , शरद खांडवे, रोहिदास सांगळे, उत्तम नागरगोजे, बाळासाहेब खांडवे, बलभीम बांगर, विशाल खांडवे, उध्दव खांडवे, गहिनीनाथ नागरगोजे , कांतीलाल सांगळे, दादासाहेब नागरगोजे, बापु खांडवे, अक्षय खांडवे आदी सह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक बापु जायभाय यांनी केले.

# शिक्षकांचा जीव टांगणीला

**मुंबई । वृत्तसेवा**

गेल्या काही वर्षांमध्ये राज्यात शिक्षण भरती झाली नाही. काही दिवसांपूर्वी शासनाकडून शिक्षण भरती जाहिर केली. मात्र, सहा ते सात वर्षांपासून उमेदवार हे या भरती प्रक्रियेच्या प्रतिक्षेत आहेत. राज्यात ६७ हजार रिक्त पदे आहेत. अनेक शाळांमध्ये शिक्षक नसल्याने परिस्थिती नक्कीच गंभीर आहे. डी एड आणि बी एड पूर्ण करुन उमेदवारांना वाट पाहावी लागत आहे. अनिवार्य असलेली अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा घेतली गेली. त्यामध्ये २ लाख १६ हजार ४४३ उमेदवार उत्तीर्ण झाली. हेच नाही तर गुणवत्ता यादी देखील जाहीर करण्यात आली. केवळ ११ हजार जागा भरण्यात आल्या. या गुणवत्तांना न्याय म्हणून नाही तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या हजारो शाळा शिक्षकांविना होत्या. २५ टक्के पदांची प्रक्रिया सुरू केली. ५० हजार शिक्षकांची भरती होणार असे आव्हान देखील सरकारकडून करण्यात आले होते. सतत शिक्षक भरती होत नसल्याने बेरोजगारांची संख्या वाढत आहे.



## पेट्रोल झालं स्वस्त

मुंबई – लोकसभा निवडणुकांना काहीच दिवस शिल्लक असताना केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने आता मोठी घोषणा केली आहे. सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देत पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती कमी करण्याची घोषणा केली. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती प्रति लिटर प्रत्येकी २ रुपयांनी कमी केल्या आहेत. १५ मार्च २०२४ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून संपूर्ण देशभरात पेट्रोल डिझेलच्या नव्या किंमती लागू होतील. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवरून याबाबतची माहिती दिली. त्यांनी पोस्ट करत म्हंटले की, पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत २ रुपयांनी कपात करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कोट्यवधी भारतीयांच्या कुटुंबाचे कल्याण आणि सुविधा हेच आपले ध्येय असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. भारतातील अनेक शहरांमध्ये पेट्रोलचे दर हे शंभरी पार पोहोचले होते. मुंबई सारख्या शहरांमध्ये तर पेट्रोलचे सुमारे १०६ रुपये प्रतिलिटर दराने विकले जात होते. तर नवी दिल्लीमध्ये ९६.७२ रुपये प्रतिलिटर दराने पेट्रोलची विक्री होत होती. मुंबईमध्ये डिझेल प्रतिलिटर ९४.२७ रुपये तर नवी दिल्लीमध्ये प्रतिलिटर ८९.६२ रुपयांनी विकले जात होते. परंतु आता या किंमतींमध्ये १५ मार्च पासून प्रत्येकी २ रुपयांनी कपात होणार आहे. भारतातील राज्यांमध्ये पेट्रोलच्या किंमती या सुमारे ९४ रुपये लिटर इतक्या आहेत. तर इटलीमध्ये पेट्रोल प्रतिलिटर १६८.०१ रुपये, जर्मनी पेट्रोल प्रतिलिटर १५९.५७ रुपये, फ्रान्स पेट्रोल प्रतिलिटर १६६.८७ रुपये तर स्पेनमध्ये पेट्रोल प्रतिलिटर १५९.५७ रुपये किंमतींनी विकले जाते. भारतात डिझेल सुमारे प्रतिलिटर ८७ रुपयांनी विकले जाते. तर इटलीमध्ये याच्या किंमती १६३.२१ रुपये, फ्रान्समध्ये १६१.५७ रुपये, जर्मनी १५५.६८ रुपये तर स्पेनमध्ये डिझेलच्या किंमती प्रतिलिटर १३८.०७ रुपये इतक्या आहेत.

## कर्मचार्यांच्या हितासाठी कटिबद्ध

पुणे – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ३४७ अंशतः अस्थायी कर्मचार्यांपैकी ३२१ कर्मचार्यांना स्थायी करण्यात आले असून उर्वरित सर्व कर्मचार्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही, या दृष्टीने योग्य मोबदला देण्यात येईल. तसेच कर्मचार्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. बारामती एमआयडीसी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अंशतः अस्थायी कर्मचारी संघटनेच्या वतीने कृतज्ञता म्हणून उद्योगमंत्री सामंत यांचा सत्कार करण्यात आला, या प्रसंगी ते बोलत होते. एमआयडीसीचे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, अधीक्षक अभियंता सुधीर नागे, कार्यकारी अभियंता नीलेश मोढवे, उप अभियंता विजय पेटकर व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब जगताप व संजय चौधर, कुंडलिक मुटेकर, माणिक लाधे, तानाजी शिंदे, संतोष कोठावळे, संदीप उगेमुगे,संजय कांबळे,दत्ता कोकरे आदी उपस्थित होते. मंत्री सामंत पुढे म्हणाले. सेवानिवृत्त कर्मचार्यांना आरोग्य विमा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्थायी कर्मचार्यांच्या पाल्यांना प्रदेशात शिक्षण घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे निर्णय लागू करण्यात आले आहेत व यावर्षी ३९७ टॅब पाल्यांना शिक्षणासाठी मोफत देण्यात येणार आहेत. कर्मचारी व अधिकार्यांनी एकत्रित काम करून उद्योजकांना उत्तम सेवा द्यावी. सूत्रसंचालन अनिल सावळेपाटील यांनी केले तर आभार पोपटराव जगताप यांनी मानले. कंत्राटी कर्मचार्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्यासाठी उपोषण, विष प्राशन अशी विविध आंदोलने केली. न्यायालयीन लढाही दिला. परंतु, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य मंत्रिमंडळाने योग्य निर्णय घेतल्याने कर्मचार्यांना न्याय मिळाला, अशी भावना कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब जगताप यांनी व्यक्त केली.


## अल्पवयीन मुलाचे अपहरण गुन्हा दाखल

परभणी – हिंगोली शहरातील श्रीनगर रीसाला बाजार भागातील ११ वर्षीय मुलगा सायकल घेऊन खेळण्याकरता गेला असता तो बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच्या कुटूंबियांनी गुरुवारी १४ मार्चला हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दिली आहे. यावरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. हिंगोली शहरातील श्रीनगर दिसाला बाजार भागातील आदित्य सागर बक्षी (११) हा इयत्ता सहावी वर्गात शिक्षण घेतो. बुधवारी ता. १३ दुपारी चार वाजण्याच्या सुमारास तो सायकल खेळण्यासाठी जातो असे सांगून घरातून बाहेर पडला. सायंकाळी उशीरा पर्यंत तो घरी परतला नसल्याने त्याच्या कुटुंबियांनी त्याचा शोध घेण्यास सुरवात केली. नातेवाईकांकडेही माहिती घेतली असता त्याचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही. या घटनेची माहिती हिंगोली शहर पोलिस ठाण्यात देण्यात आली. पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, उपनिरीक्षक कपील आगलावे, जमादार संजय मार्के यांच्या पथकाने त्याचा शोध सुरु केला. पोलिसांनी त्याच्या घराच्या परिसरासह इतर ठिकाणी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून त्याची माहिती घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. मात्र सायंकाळी उशीरा पर्यंत त्याची माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे पोलिसांनी आता त्याचे अपहरण झाल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्रामध्ये महायुतीचाच झेंडा

**मुंबई । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला आता सुरुवात झाली आहे. कोणत्याही क्षणी लोकसभेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, महाराष्ट्रामध्ये लोकसभेत कोण बाजी मारणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. कारण, राज्यात महाविकास आघाडी सरकार पाडण्यात आलं. त्यानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये उभी फूट पडली. त्यामुळे तयार झालेल्या नव्या राजकीय समीकरणामध्ये महाराष्ट्राची जनता कुणाला कौल देणार याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. याबद्दलच नेटवर्क १८ ने महापोल केला आहे. नेटवर्क १८ ने केलेल्या मेगापोलमधील सर्व्हेच्या नुसार, महाराष्ट्रामध्ये एनडीए आघाडीला ४१ जागाा मिळणार असा अंदाज आहे. तर इंडिया आघाडी अर्थात ठाकरे गट आणि पवार गटासह काँग्रेसला ७ जागा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रामध्ये एनडीए अर्थात महायुतीच्या वाट्याला ४८ टक्के मतांची टक्केवारी इतकी असण्याची शक्यता आहे. तर इंडिया आघाडी अर्थात महाविकास आघाडीकडे ३४ टक्के मतांची टक्केवारी असणार आहे. तर अपक्षांना १८ टक्के मतांची टक्केवारी आहे. विभागानुसार विचार केला तर, मुंबई ते विदर्भ आणि कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात किती जागा जिंकल्यात याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भामध्ये महायुतीला ९ मिळणार अशी शक्यता आहे. तर इंडिया आघाडीला फक्त १ जागा मिळेल.



कोकणामध्ये एकूण ३ मतदारसंघाचा अंदाज घेण्यात आला. या तिन्ही ठिकाणी महायुतीच जिंकणार असा अंदाज आहे. या ठिकाणी उद्धव ठाकरे यांना मोठ्या धक्का बसण्याची चिन्ह आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात लोकसभा कोण जिंकणार यांचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामध्ये मुंबईसह ठाण्यात ९ जागा महायुती जिंकेल असा अंदाज आहे. तर इंडिया आघाडीला एकच जागा मिळेल असा अंदाज आहे. तर उत्तर महाराष्ट्रामध्ये एकूण ६ जागांचा अंदाज घेण्यात आला. यामध्ये महायुती ५ जागा जिंकणार अशी शक्यता आहे. या ठिकाणी इंडिया आघाडी १ जागा जिंकेल अशी शक्यता आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये शिवसेना आणि भाजपने एकत्र निवडणूक लढवली होती. भाजपने २२ जागा तर शिवसेनेनं १८ जागा जिंकल्या होत्या. राष्ट्रवादी ४ तर काँग्रेस आणि एमआयएमने प्रत्येकी १ जागा जिंकली होती. विशेष म्हणजे, मागील निवडणुकीत भाजप आणि शिवसेना एकत्र लढले होते, त्यामुळे दोघांनी युतीने ४२ जागा जिंकल्या होत्या. आताही याच निकालाची पुनरावृती होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रामध्ये जागावाटपासाठी अजूनही रस्सीखेच सुरू आहे. भाजपने दुसर्या यादीमध्ये २० उमेदवारांची घोषणा केली आहे. यामध्ये काही विद्यमान खासदारांचा पत्ता कापला आहे. पंकजा मुंडे, मिहिर मिहिर कोटेचा, मुरलीधर मोहोळ, पियूष गोयल आणि सुधीर मुनगंटीवार यांना संधी देण्यात आली आहे. तर मित्र पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादीसोबत अजूनही जागावाटपाची चर्चा सुरू आहे. यामध्ये शिवसेना १० तर राष्ट्रवादीला ४ जागा मिळण्याची शक्यता आहे. सत्तेतून पायउतार झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्याकडे असलेले निम्मे खासदार हे शिंदे गटात दाखल झाले. त्यापाठोपाठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्येही फूट पडली. अजित पवार यांनी दोन खासदारांना घेऊन महायुतीसोबत घरोबा केला आहे. आता मविआने भाजप विरोधी पक्षांना सोबत घेऊन लोकसभा लढवण्याचा निर्धार केला आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित आघाडीला मविआसोबत घेणार आहे. अद्याप जागावाटपाबद्दल चर्चा सुरू आहे. पण, मिळालेल्या माहितीनुसार, ठाकरे गट २२ जागांवर लढणार आहे, तर काँग्रेस १५ आणि पवार गट ९ जागांवर लढणार आहे. तर वंचित आघाडीला २ जागा मिळणार असा फॉर्म्युला ठरणार आहे. देशभरात हा विशेष सर्व्हे करण्यात आला आहे. यामध्ये ५४३ जागांपैकी ५१८ लोकसभा मतदारसंघात हा सर्व्हे केला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये १ लाख ८ हजार ७८० नमुने घेण्यात आले आहे. तर दुसर्या टप्प्यात १ लाख १८ हजार ६१६ नमुने घेण्यात आले आहे. आतापर्यंत कोणत्याही सर्व्हेमध्ये ही सर्वाधिक आकडेवारी आहे. ५४३ पैकी ५१८ लोकसभा मतदारसंघामध्ये जाऊन हा सर्व्हे तयार करण्यात आला आहे. 'मेगा ओपनियन पोल'साठी एकूण २१ राज्यांमध्ये हा सर्व्हे करण्यात आला आहे. प्रत्येक लोकसभा मतदारसंघात आणि ३ विधानसभा मतदारसंघात सुद्धा हा सर्व्हे झाला आहे. एका विधानसभा मतदारसंघातील ५ बूथवर हा सर्व्हे झाला आहे. विशेष म्हणजे, या सर्व्हेमध्ये लोकांची मतं जाणून घेण्यासाठी प्रत्यक्षरित्या भेट घेऊनच मत नोंदवण्यात आलं आहे. देशभरातील १ लाख २० हजार लोकांचा या सर्व्हेमध्ये सहभाग आहे. महत्त्वाचं म्हणजे, पारदर्शकता आणण्यासाठी एकदा नाही तर दोनदा हा सर्व्हे करण्यात आला आहे.

# शिक्षक पदाची होणार भरती

**मुंबई । वृत्तसेवा**

नोकरीच्या शोधात असणार्यांसाठी एक मोठी संधी आहे. विशेष म्हणजे मेगा भरतीला सुरूवात झालीये. या भरती प्रक्रियेतून शिक्षकांची विविध पदे ही भरली जाणार आहेत. या भरती प्रक्रियेबद्दलची अधिसूचना ही नुकताच प्रसिद्ध करण्यात आलीये. नोकरीच्या शोधात असणार्यांनी अजिबातच वेळ वाया न घालता या भरती प्रक्रियेसाठी फटाफट अर्ज करावीत. या भरती प्रक्रियेसाठी आपल्याला फक्त आणि फक्त ऑफलाइन पद्धतीने अर्ज हा करावा लागणार आहे. महानगरपालिकेकडून ही भरती प्रक्रिया राबवली जातंय. चला तर मग जाणून घ्या या भरती प्रक्रियेबद्दलची सविस्तर माहिती. ही भरती प्रक्रिया पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबवली जातंय. या भरती प्रक्रियेतून पदवीधर शिक्षक आणि सहायक शिक्षक ही पदे भरली जाणार आहेत. या भरती



प्रक्रियेतून तब्बल ३२७ पदे ही भरली जाणार आहेत. नोकरीच्या शोधात असणार्यांसाठी खरोखरच ही एकप्रकारची मोठी संधीच म्हणावी लागेल. मराठी माध्यम, हिंदी माध्यम आणि उर्दू माध्यमांची पदे भरली जातील. सहायक शिक्षक या पदासाठी उमेदवार हा डी.एड् पास असावा. पदवीधर शिक्षक या पदासाठी एच.एस.सी.- डी.एड, बी.एस.सी- बी.एड असावे. या भरती प्रक्रियेसाठी आपल्याला फक्त आणि फक्त ऑफलाइन पद्धतीनेच अर्ज ही करावी लागणार आहेत. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही १६ एप्रिल २०२४ आहे. त्यापूर्वीच आपल्याला या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करणे आवश्यक आहेत. भरतीसाठी अर्ज करताना आपल्याला कागदपत्रे देखील सोबत जोडावी लागतील. खरोखरच नोकरीच्या शोधात असणार्यांसाठी ही मोठी संधीच म्हणावी लागेल. चला तर मग इच्छुकांनी लगेचच अर्ज करावीत. परत एकदा लक्षात ठेवा की, या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही १६ एप्रिल २०२४ आहे. या तारखेच्या अगोदरच आपल्याला अर्ज ही करावी लागणार आहेत, उशीरा आलेले अर्ज हे स्वीकारले जाणार नाहीत.

## मराठवाड्यातून सुपरफास्ट रेल्वे प्रवास

**नांदेड । वृत्तसेवा**

दक्षिण मध्य रेल्वेच्यानांदेड विभागात रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून, ही कामे मार्चअखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एप्रिलमध्येच विभागातील संपूर्ण मार्ग इलेक्ट्रिक रेल्वे धावण्यासाठी सज्ज होणार आहे. रेल्वे गाड्यांची गती वाढण्यासाठी त्याचप्रमाणे रेल्वेचा प्रवास पर्यावरणपूरक व्हावा, या उद्देशाने रेल्वेने लोहमार्गाचे विद्युतीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात साधारणत: दीड वर्षापासून ही कामे सुरू असून, ती आता पूर्णत्वाला जात आहेत. विशेष म्हणजे, काही मार्गांवर आताच इलेक्ट्रिक रेल्वे धावत आहे. प्राप्त माहितीनुसार, सद्य:स्थितीला नांदेड विभागातील ४५०.३९ किलोमीटर अंतराचे विद्युतीकरण पूर्ण झाले असून, उर्वरित मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सध्या मिरखेल ते नांदेड या साधारणत: ४३ किलोमीटर अंतराचे विद्युतीकरण शिल्लक आहे. ही कामे काही ठिकाणी दुसऱ्या आणि काही ठिकाणी तिसऱ्या टप्प्यात आहेत. ३१ मार्चपर्यंत या मार्गावरची संपूर्ण कामे पूर्ण केली जाणार असून, एप्रिल महिन्यात नांदेड विभागातील सर्व रेल्वे मार्ग इलेक्ट्रिक रेल्वेसाठी सज्ज होण्याची शक्यता आहे.

# सरकारी कर्मचार्यांसाठी वेतन आयोग लागू होणार

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

केंद्रीय कर्मचार्यांसाठी आनंदाची बातमी येत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रीय कर्मचार्यांसाठी नवा वेतन आयोग (८'वा वेतन आयोग) स्थापन करण्यास मंजुरी मिळू शकते. नुकतीच सरकारने कर्मचार्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) चार टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. आता कर्मचार्यांचा महागाई भत्ता ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. परंतु, नवीन वेतन आयोग स्थापन करण्याबाबत सरकारने अद्याप चर्चा केलेली नाही. दरम्यान, यंदा सरकार त्यांना जबरदस्त भेट देऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सातव्या वेतन आयोगाची मुदत आता संपत आहे. लवकरच त्यांच्यासाठी नवा वेतन आयोग स्थापन करण्यात येणार असून वेतनसुधारणाही करण्यात येणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्मचारी संघटना आणि वाढती मागणी यांच्यात फाइल तयार केली जात आहे. मात्र, तो किती काळ लागू राहील, याची कोणतीही मुदत देण्यात आलेली नाही. दरम्यान, सरकारकडून याबाबत कोणतीही



अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. तसे झाल्यास कर्मचार्यांसाठी खरोखरच आनंदाची बातमी असेल. महागाई भत्त्यात सातत्याने ४ टक्के वाढ केल्यानंतर आता वेतनवाढीची पाळी आली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पुढील वेतन आयोग ाच्या स्थापनेबाबत सरकार निर्णय घेऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. आतापर्यंत आठवा वेतन आयोग येणार नाही, अशी चर्चा होती. परंतु, आता सातव्या वेतन आयोगानंतर आता पुढील वेतन आयोगाची तयारी सुरू असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, सरकारकडून अद्याप याला दुजोरा देण्यात आलेला नाही. परंतु, कर्मचार्यांच्या सततच्या मागणीनंतर सरकार पुढील वेतन आयोगाचा विचार करू शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आठवा वेतन आयोग आला तर पगारात सर्वात मोठी वाढ होणार आहे. हे प्रकरण पुढे सरकत आहे, असे नक्कीच म्हणता येईल. नव्या वेतन आयोगात काय येईल आणि काय येणार नाही, हे सांगणे घाईचे ठरेल, असेही सूत्रांचे म्हणणे आहे. कारण, संपूर्ण जबाबदारी वेतन आयोगाच्या अध्यक्षांची असेल. २०२४ मध्ये होणार्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर नव्या वेतन आयोगाच्या अध्यक्षांची ही घोषणा होऊ शकते. त्यांच्या देखरेखीखाली समिती स्थापन करण्यात येणार असून त्यानंतर वेतनात कोणत्या फॉर्म्युल्यात वाढ करावी, याचे चित्र स्पष्ट होऊ शकते. सूत्रांच्या माहितीनुसार, २०२४ मध्ये आठवा वेतन आयोग स्थापन करण्यात यावा. त्याचबरोबर दीड वर्षाच्या आत त्याची अंमलबजावणी होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, असे झाल्यास केंद्रीय कर्मचार्यांच्या पगारात प्रचंड वाढ होईल. सातव्या वेतन आयोगाच्या तुलनेत आठव्या वेतन आयोगात अनेक बदल शक्य आहेत. फिटमेंट फॅक्टरबाबतही काही बदल होऊ शकतात. सध्या सरकार दहा वर्षांतून एकदा वेतन आयोगाची स्थापना करते. सातव्या वेतन आयोगाच्या तुलनेत आठव्या वेतन आयोगात कर्मचार्यांची लॉटरी काढण्यात येणार आहे. सर्व काही सुरळीत राहिल्यास कर्मचार्यांच्या पगारात सर्वात मोठी वाढ अपेक्षित आहे. कर्मचार्यांचा फिटमेंट फॅक्टर ३.६८ पटीने वाढणार आहे. तसेच फॉर्म्युला काहीही असला तरी कर्मचार्यांच्या मूळ वेतनात ४४.४४ टक्के वाढ होऊ शकते.

# गुढीपाडवा वृषभ राशींना पावणार!

चैत्र महिन्याला ज्योतिषशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात येणार्या चैत्र नवरात्रीमुळेच त्याला वैशिष्ट्य प्राप्त होतं. याच नवरात्रीच्या सुरुवातीलाच हिंदू नववर्ष म्हणजेच गुढीपाडवा सण साजरा केला जातो. यंदाचा गुढीपाडवा खर्या अर्थाने काही लोकांसाठी भरभराटीचा ठरणार आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, ग्रह-तारे विशिष्ट कालावधीनंतर आपली चाल आणि स्थिती बदलतात. त्यातून वेगवेगळे योग तयार होतात. या योगांचा सर्व १२ राशींवर परिणाम होतो. मग काही राशींना त्यातून सुख मिळतं, तर काही राशींच्या वाट्याला दुःख येतं. यंदाच्या गुढीपाडव्याला ग्रह-तार्यांची स्थिती काही राशींच्या व्यक्तींसाठी प्रचंड अनुकूल असणार आहे. त्यातून त्यांना भरपूर सुख अनुभवायला मिळेल.



झारखंडमधील देवघरचे प्रसिद्ध ज्योतिषी पंडित नंदकिशोर मुद्गल यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंदू नववर्षाच्या सुरुवातील चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथी असते. याच दिवसापासून चैत्र नवरात्रीला सुरुवात होते. यंदा ही तिथी ९ एप्रिलला आहे. तब्बल ५० वर्षांनी या दिवशी राजयोग निर्माण होतोय. याच दिवशी शश राजयोग, अमृत सिद्धी योग आणि सर्वार्थ सिद्धी योग आहे. हे तीनही योग अत्यंत शुभ मानले जातात. त्यांच्या कृपेने ३ राशींच्या व्यक्तींना भरभरून सुख मिळणार आहे. त्यांच्या पदरात एवढं ऐश्वर्य पडेल की त्यांचा स्वतःच्या नशिबावर विश्वासच बसणार नाही. या भाग्यवान राशी नेमक्या कोणत्या आहेत, पाहूया.

मेष : आपल्यासाठी नवीन वर्षाची सुरुवात अत्यंत सकारात्मक असणार आहे. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. नवं काम सुरू करायचं असेल तर त्यातही यश मिळेल. विद्यार्थ्यांना परीक्षेत चांगले गुण मिळतील. स्पर्धा परीक्षा द्यायची असेल, तर त्यासाठीही उत्तम काळ आहे.

वृषभ : आपल्यासाठी हे वर्ष शुभ ठरेल. नवीन गाडी किंवा मालमत्ता खरेदीचा योग आहे. उत्पन्न वाढेल, कुटुंबियांसोबत धार्मिक प्रवास होईल. नातेसंबंध सुधारतील. अविवाहितांना लग्नासाठी चांगले प्रस्ताव येतील.

या नवीन वर्षात आपली सर्व अडकलेली कामं मार्गी लागणार आहेत. गुंतवणूक करायची असेल, तर हे वर्ष अत्यंत शुभ ठरेल. आपल्याला भरपूर आर्थिक लाभ होणार आहे. कुटुंबात सुख, शांतीचं वातावरण असेल. जोडीदारासोबत चांगला प्रवास होईल. आरोग्यही उत्तम साथ देईल. कर्जातून मुक्ती मिळेल.

## बिअरबारसमोर गुरूजींचा राडा



बीड : शाळेतील किरकोळ वादातून दोन सहशिक्षकांनी मुख्याध्यापकावर बतईने प्राणघातक हल्ला केला. ही घटना १२ मार्च रोजी दुपारी ४ वाजता गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी जवळील एका बिअरबारसमोर घडली. यातील जखमी मुख्याध्यापकावर सध्या जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी या दोन्ही सहशिक्षकांवर गेवराई पोलिस ठाण्यात ट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. अंबादास मल्हारी नारायणकर (वय ५३ रा.विश्वासनगर, बीड) हे गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक आहेत. त्यांच्यासह सहशिक्षक घाडके, रघुनाथ नागरगोजे, लक्ष्मण परजणे, संतोष गिरी हे बीडवरून शाळेत दररोज एकाच गाडीत जातात. १२ मार्च रोजीही ते नेहमीप्रमाणे शाळेत गेले. शाळा सुटल्यावर परत बीडला निघाले. यावेळी हे सर्वजण मादळमोही येथील हॉटेल गौरी बिअर बारमध्ये जेवणासाठी गेले. तेथे आचारी नव्हते. परंतू याच दरम्यान त्यांच्यात शाब्दीक वाद झाला. यामुळे नारायणकर हे पाडळसिंगी रोडवर येऊन उभा राहिले. यावेळी इतर चारही शिक्षक एका गाडीतून त्यांच्याकडे आले. चारचाकी गाडी त्यांच्या पायावर घालून जखमी केले. त्यानंतर संतोष गिरी याने नारायणकर यांच्या भूवईवर बतईने हल्ला केला. तर रघुनाथ नागरगोजे याने जातिवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

## अपघातातून मुले बचावली

बीड : बीड शहरातील एक मुलगा खेळताना वीजेच्या बोर्डला चिटकला. तर दुसरा मुलगा खेळताना विहिरीत पडला. सुदैवाने नातेवाईकांनी वेळीच पाहिल्याने हे दोन्ही बालके बचावली. सध्या या दोघांचीही प्रकृती स्थिर आहे. या घटना मंगळवारी उघडकीस आल्या. बीड तालुक्यांतील गाडेवाडी येथील प्रकाश वावरे यांनी उन्हात घटकाभर विसावा घ्यावा म्हणून पडले. त्यांना कधी झोप लागली ते कळलेच नाही. त्यांच्या जवळ असलेला दोन वर्षाचा तेजस्वी वावरे हा दोन वर्षाचा मुलगा खेळत असताना मंदिराजवळच्या विहिरीत पडला. विहिरीत चारपाच फुट पाणी होते. इकडे मुल दिसत नाही म्हणून आईने आरडाओरड सुरु केली. एवढ्यात प्रकाश शेषराव वावरे यांनी शोधाशोध सुरू केली. बाजूलाच असलेल्या विहिरीत त्यांना तेजस्वी गटांगळ्या खाताना दिसला. त्यांनी तात्काळ विहिरीत उतरून त्याला बाहेर काढले. बेशुद्धावस्थेत त्याला बीड येथील खाजगी बालरुग्णालयात दाखल केले. आता त्याची प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. संजय जानवळे, डॉ. अनंत सांगळे यांनी सांगितले.

## माध्यमांच्या जाहिरातीबाबत अन्यायाची भूमिका

मुंबई – माध्यमांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींबाबत सातत्याने अन्यायाची भूमिका घेतली जात आहे. सरकार आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभाग याला जबाबदार आहे. सरकार आता निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून ही भूमिका घेत आहे. हा अन्याय थांबवा. माध्यमांना नियमाप्रमाणे जाहिराती द्या. जाहिरातीचे देयके वेळेवर काढा. अन्यथा आंदोलनाचे हत्यार उपसावे लागेल, असा इशारा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी दिला आहे. ६ ते ८ मार्च या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा दैनिक वृत्तपत्रांना विकसित भारत व विकसित महाराष्ट्रच्या दर्शनी जाहिरात वितरित करण्यात आलेल्या आहेत, परंतु या जाहिराती वाटपात महाराष्ट्रातील साप्ताहिकांना डावलण्यात आले. असे का? विशेष मोहिमेंतर्गत एका जाहिरातीखेरीज काही समकक्ष दैनिकांना अधिकच्या जाहिरातींचे वितरण करण्यात येत आहे. असे का? बाकी दैनिकांनी काय पाप केले, असा प्रश्न 'व्हॉईस ऑफ मीडिया 'ने उपस्थित केला आहे. जाहिरात वितरण करताना या विभागाचा आळसीपणा पुढे येत आहे. जर रात्री अकरा वाजता जाहिराती मिळत असतील तर, ती जाहिरात पानावर लावून अंक छपाईसाठी द्यायचा कधी, हा प्रश्नही निर्माण होतो. अनेक जाहिरातीची बिले २०१९ पासून निघालेली नाहीत. म्हणजे १९ ते आत्ता २४ पर्यंत अनेक बिलांची देयके तशीच प्रलंबित आहेत.




# बीड जिल्ह्याची कामगिरी सर्वोच्च ठरणे अभिमानास्पद -मुंडे

**परळी । वृत्तसेवा**



शेतकऱ्यांच्या एक लाख ६० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा यांनी आज येथे केली. बीड जिल्ह्यातील किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटल प्रकल्प – जनसमर्थचा शुभारंभ दूकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून हस्ते झाला. या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली. 'सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहणारे आहे. डिजीटल क्रांतीचा वापर शेतकऱ्यांसाठी करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या डिजीटल प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती येणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले. कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील २२ शेतकऱ्यांच्या खात्यात किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून थेट रक्कम एका क्लिकद्वारे जमा करण्यात आली. या कार्यक्रमास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार राजेश पवार, आमदार संजय रायमुलकर, कृषि विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनूप कुमार, कृषि आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटायझेशनच्या या जनसमर्थ प्रकल्पासाठी देशातील दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला, हे आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचे असून, बीड जिल्ह्यातील महसूल, कृषि अशा विविध विभागांनी एकत्र येऊन गेल्या काही दिवसांत ४ लाख ७५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी करून त्यांचे फार्मर्स आयडी तयार केले आहेत. याकरिता दोन पचीही निर्मिती करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्याला कागदपत्र विरहीत आणि घरबसल्या अल्पमुदतीच्या कर्जासाठी अर्ज करता येतो. याशिवाय या आयडीमुळे त्यांना शासनाच्या अन्य योजनांसाठीही अर्ज करणे आणि लाभ घेणे सुलभ होणार आहे. ग्रीस्टॅक- सीपीएमयू यांच्याकडून या प्रकल्पाचे कार्यान्वयन केले जात आहे. या मोहिमेत बीड जिल्ह्याने सर्वोच्च कामगिरी केली असणेही आमच्यासाठी अभिमानास्पद असून, याचा लाभ निश्चितच जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. आमचे सरकार सर्वसामान्यांचे आणि शेतकऱ्यांचे आहे. हे सरकार बळीराजाचे आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी, गारपीट अशा नैसर्गिक संकटात आपण त्यांना भरभरून मदत केली आहे. आपला देश कृषि प्रधान आहे. आपण शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानूनच सर्व योजनांचे नियोजन करतो आहोत. शेतकऱ्याना गेल्या दिड वर्षात ४५ हजार कोटींचे मदत आपण केली आहे. सिंचनांचे १२० प्रकल्प मार्गी लावले आहेत. यामुळे राज्यातील १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. शेती, माती आणि शेतकरी यांच्याशी आपली नाळ जोडलेली आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्य सरकार राबवत असलेल्या एक रुपयात पीक विमा, जलयुक्त शिवार अशा योजनांचीही माहिती दिली. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कृषि क्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळेच डिजीटल क्रांतिचा वापर शेतकऱ्यांसाठी आणि कृषि क्षेत्रासाठी करण्याचा हा त्यांच्या संकल्पनेतील प्रकल्प देखील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणणारा ठरेल. शेतकरी, बळीराजा हा अन्नदाता, मायबाप आहे. आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचा पुनरुच्चारही मुख्यमंत्र्यांनी केला. शेतकऱ्यांच्या कर्जासाठी लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्याच्या मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या घोषणेचे कृषिमंत्री श्री. मुंडे यांनी स्वागत केले. या निर्णयाचा पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना निश्चित मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मंत्री श्री. मुंडे म्हणाले की, देशातील सहा जिल्ह्यात हा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात आला. त्यामध्ये बीड आणि उत्तर प्रदेशातील फरुखाबाद या जिल्ह्यांनीच याची यशस्वी कार्यवाही केली. बीड जिल्ह्यातील सर्वच यंत्रणांनी अहोरात्र राबून सुमारे १ हजार २५१ गावांतील शेतकऱ्यांचा डाटा एकत्र केला. यातून सुमारे ४ लाख ७५ हजार शेतकऱ्यांचे फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. राज्यातील कृषि क्षेत्रातील विकासाला चालना देणारी ही योजना ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी या प्रकल्पासाठी काम करणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक तसेच जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांचेही कौतुक केले. जिल्हाधिकारी श्रीमती मुधोळ-मुंडे यांनी प्रास्ताविक केले तसेच आभार मानले.

# सेवानिवृत्त पत्रकारांचे मानधन ११ वरून २० हजारांवर

**बीड । प्रतिनिधी**



देशभरातील पत्रकारांच्या समस्यांकडे लक्ष वेधून त्या शासनदरबारी मांडणाऱ्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या रेट्यामुळे शासनाने राज्यातील सेवानिवृत्त पत्रकारांच्या मानधनात दुपटीने वाढ केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने यासंदर्भात आवाज उठवला होता. अखेर आज शासनाने याबद्दलचा जीआर काढून हा विषय मार्गी लागला, असे सांगितले आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया'ला मिळालेल्या यशाबदल राज्यभरातल्या अनेक जिल्ह्यांच्या ठिकाणी पेढे वाटून, फटाके फोडून पदाधिकारी, पत्रकार यांनी आनंद व्यक्त केला आहे. देश-विदेशात क्रमांक एकची पत्रकार संघटना असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने सेवानिवृत्त पत्रकारांचा मानधन वाढीबाबतचा विषय शासनाकडे रेटून धरला होता. नुकतेच झालेले हिवाळी अधिवेशन, त्या अगोदर तीन वेळा 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने धरणे आंदोलन केल्यानंतर शासनाने पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन एक समिती स्थापन केली होती. यावेळी संघटनेने पत्रकारांच्या आरोग्य, मुलांचे शिक्षण, निवासाचा प्रश्न, निवृत्ती वेतनाचा प्रश्न यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी केली होती. पत्रकारांच्या आरोग्य योजनेत देखील भरीव वाढ करण्याची मागणी केली होती. संघटनेच्या यापूर्वी करण्यात आलेल्या विविध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सातत्याने संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी वेळोवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस, माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या भेटी घेऊन त्यांना राज्यातील पत्रकारांच्या समस्यांबाबत सांगितले होते. बारामती येथे सुमारे दोन हजार पत्रकारांच्या उपस्थितीत अधिवेशन घेण्यात आले. यावेळी देखील मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनातील मुद्द्यांवर आधारित आपल्या मागण्या शासनाकडे पाठवा, त्यावर गांभीर्याने विचार केला जाईल, असे आश्वासन दिले होते. ज्येष्ठ पत्रकारांना सामाजिक सुरक्षा, सुविधा देण्याच्या दृष्टीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना अंतर्गत शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सव पत्रकार कल्याण निधीमधील ठेवीवरील व्याजाच्या रकमेतून दरमहा ११ हजार रुपये एवढे अर्थसाहाय्य पात्र ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येत होते. यावर विधान परिषदेत व्हॉईस ऑफ मीडियाचा आवाज आमदार धीरज लिंगाडे यांनी बुलंद केला होता. शासनाचे लक्ष वेधले होते. दहा मार्च रोजी घेतलेल्या शासन निर्णयानुसार अधिस्वीकृती धारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत दिले जाणारे अकरा हजार रुपयांचे अर्थसाहाय्य वीस हजारांपर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या समितीने शिफारस करून हा सकारात्मक निर्णय पुढे आला आहे. हा व्हॉईस ऑफ मीडियाने दिलेल्या लढ्याचे यश आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी दूरध्वनीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

# सुसज्ज नाट्यगृह गेवराईकरांच्या सेवेत -आ.लक्ष्मणअण्णा





**गेवराई । प्रतिनिधी**

आधी गेवराई शहरातील लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या, आता सर्व सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. आता आज पासून हा जलतरण तलाव शहरवाशीयांसाठी खुला करत आहोत. याबाबत विशेष काळजी घेऊन ती सुरळीत चालवण्यासाठी आपण न.प.च्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी सांगितले. आज गेवराई शहरातील जलतरण तलावाच्या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर न.प.मुख्याधिकारी विक्रम मांडूरखे, सुशील जवंजाळ, ऍड.भगवान घुंबार्डे, जे.डी. शहा, सरपंच बोबडे, शाम कुंड, राहुल खंडागळे, दादासाहेब गिरी, भारत गायकवाड, ब्रम्हदेव धुरंधरे, जेष्ठ पत्रकार उत्तम हजारे, महेश आहेर, याहीया खान यांच्यासह आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, गेवराई न.प.च्या माध्यमातून आजपर्यंत आपण शहरात ज्या वास्तू उभारल्या आहेत, त्या लोकांच्या उपयोगी पडतील आशा गरजा आधी पूर्ण केल्या आता येणाऱ्या काळात शहरवशीयांसाठी विविध सुख सुविधा उपलब्ध करून देता त्या सुरळीत चालवल्या गेल्या पाहिजेत यासाठी नियोजन करण्यात येईल. तसेच शहरात उभारलेले सुसज्ज नाट्यगृह लवकरच गेवराईकरांच्या सेवेत सुरू करण्यात येईल ते ही खुले करण्यात येणार आसल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना सांगितले. दरम्यान यावेळी आ.पवार यांच्या हस्ते बटन दाबुन जलतरण तलावात पाणी सोडून लोकार्पण करण्यात आले. यावेळी बोलतांना मुख्याधिकारी विक्रम मांडुरके म्हणाले की महाराष्ट्रातील अनेक शहरात रस्ता, नाली, पाणी, यामध्येच दिसले पण गेवराईत आल्या नंतर आ.लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास झालेला दिसतोय तर आ.पवारांच्या प्रयत्नातून वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत शहरात जलतरण तलाव सुरू करण्यात आला तरी नागरिकांनी आप आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे

यावेळी विठ्ठल मोटे, संजय इगळे, वैभव पाटील, किशोर धोंडलकर, बद्दोदिन, आप्पासाहेब कानगुडे, राम पवार, राजाभाऊ आर्दड, सतिष दाभाडे, छगन आप्पा हादगुले, बाबा खरात, करण सुतार, मुन्नाभाई, लक्ष्मण चव्हाण, शेख निजाम, समाधान मस्के, अमोल मस्के, पिटु साळवे. ावसाहेब काळे, श्रीहरी गंगाधर, महेश चेके, रजित खाजेकर, उध्दव मडके, सय्यद हासन, आदींसह शहरातील प्रतिष्ठित नागरिक व न.प.कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राघव वाव्हळे यानी केले आभार भरत गायकवाड यांनी मानले,

# आरोग्यदूत बाजीराव चव्हाण गोरगरीब जनतेचा कैवारी

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाने व मंगेश चिवटे यांच्या सहकार्याने ,व धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष महा.राज्य, बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे एक महिन्यात मिळाली ३१ रूग्णांना २५ लाख ५० हजार रुपयांची भरघोस आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून मिळून दिली. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे हा प्राण मनात बाळगुन मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी वैद्यकीय सेवेचा घेतलेला वसा आणि त्यांचे सेवेकरी म्हणून बाजीराव चव्हाण यांच्या बीड येथे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा बाजीराव चव्हाण यांचे संपर्क कार्यालयातून गेल्या अनेक महिन्यांपासून आरोग्य सेवेच काम सातत्याने चालु आहे. या सेवे मधून आत्तापर्यंत ५०० पेशा जास्त रुग्णांना आर्थिक मदत मिळून दिली आहे. बाजीराव चव्हाण यांच्या आरोग्य सेवाचा डंका बीड जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. त्यांनी केलेल्या आरोग्य सेवेचे कौतुक सर्वस्तरातून केले जात आहे. त्याचप्रमाणे चालु मार्च महिन्यात ३१ रूग्णांना भरघोस अशी २५ लाख ५०हजार रुपयांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षच्या माध्यमातून बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे आर्थिक मदत मिळाली जात आहे .यामुळे बीड जिल्ह्यात सर्वत्र वैद्यकीय क्षेत्रात एक आशेचा किरण म्हणून गोरगरीब सर्वसामान्य लोकांना आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्याकडून येणाऱ्या काळात खूप मोठ्या अपेक्षा वाढल्या असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयावर लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत आहे. बाजीराव चव्हाण करत असलेल्या आरोग्य सेवेतून लोकांची होत असलेले आर्थिक मदत त्यामुळे गोरगरीब लोकाना या मदतीचा खुप मोठा आधार मिळत आहे.कित्येक रुग्णाचे पैसे मूळ उपचार होत नव्हते ते आज बाजीराव चव्हाण यांच्या माध्यमातून त्यांना त्यांच्या व्याधी पासून मुक्तता मिळत आहे.त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळत आहे.

रुग्णाचे नाव – १) राजू अंबादास पवार हृदयरोग १ लाख २) कल्याण उत्तम येडे नी रिप्लेसमेंट ५० हजार ३) सुशीला विलास निकम डायलेसिस ५० हजार
४) मिराबाई फकीरा धापसे कर्करोग १ लाख ५) अमोल शिवाजी शिंदे लिव्हर ट्रान्सप्लांट २ लाख ६) स्वजराबाई भीमराव जधे मेंदू रोग ५० हजार ७) प्रसाद माणिक चव्हाण मेंदू रोग १ लाख ८) कृष्णाबाई धोंडीबा दळवी मेंदू रोग १ लाख ९) सूर्यकांत शाहूराव काळे कर्करोग ५० हजार १०) ईश्वर कुंडलिक बुधनर हीप रिप्लेसमेन्ट १ लाख ११) श्रेयस अतुल सदागळे अपघात १ एक लाख १२) संगीता दादासाहेब काशीद कर्करोग १ लाख १३) अश्विनी नितीन शिंदे नवजात बालक ५० हजार १४) शिवकन्या गोविंद फड नवजात बालक ५० हजार १५) ऐश्वर्या नितीन अंकुशे नवजात बालक ५० हजार १६) दौलत नामदेव गावडे हृदयरोग १ लाख १७) नानासाहेब हरीमन घुमरे अपघात १ लाख १८) विष्णू अशोक धनुरे अपघात १ लाख १९) जमीलाबी शेख बेलदार कर्करोग १ लाख २०) फुरकान शाहरुख शेख केमोथेरपी ५० हजार २१) अभिजीत अनिल मुके अपघात १ लाख २२) वर्षा विकास वाघमोडे नवजात बालक ५० हजार २३) सोमनाथ सूर्यभान गंडे कर्करोग १ लाख २४) नीलफर मन्सूर पठाण नवजात बालक ५० हजार २५) इंदुबाई बाबू खंदारे केमोथेरपी ५० हजार २६) शंकर नारायण देशमुख अपघात १ लाख २७) सरस्वती दामोदर तळे कर्करोग १ लाख
२८) शकुंतलाबाई किसनराव कदम केमोथेरपी ५० हजार २९) आशा ओमप्रकाश भोगे मेंदू रोग १ लाख ३०) यमुनाबाई श्रीराम खाडे कर्करोग १ लाख ३१) शेख निलोफर शेख सलीम नी रिप्लेसमेंट ५० हजार

कार्यालय पत्ता:- शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा बाजीराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय बीड मुक्ताई बिल्डिंग, मुक्ताई लॉन्स, बार्शी रोड बीड, ४३११२२

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५, संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com